# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.03.2025** **वारःसोमवार**

---

- न्यूझीलंडला हरवत भारतीय संघानं बारा वर्षांनंतर आयसीसी करंडक जिंकला,
- राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधीमंडळात सादर होणार,
- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून,
- मुंबईत पाण्याची टाकी स्वच्छ करताना ४ कामगारांचा गुदमरुन मृत्यू,
- आणि
- मुंबई ठाण्यासह राज्यातल्या पाच जिल्ह्यांना येत्या दोन दिवसात उष्णतेच्या लाटेचा इशारा.

**<u>आयसीसी-चॅंपिअन्स-करंडक-</u>**

आयसीसी चॅंपिअन्स क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघानं काल १२ वर्षानंतर करंडक मिळवला. दुबई इथं काल झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं न्यूझीलंडचा चार गडी राखून पराभव केला. ही स्पर्धा तीन वेळा जिंकणारा भारत एकमेव देश ठरला आहे. न्यूझिलंडनं दिलेल्या २५२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतानं आक्रमक सुरुवात केली. पहिला गडी बाद होण्यापूर्वी शुभमन गील आणि रोहित शर्मानं १०५ धावांची भागीदारी केली. विजयासाठी श्रेयस, राहुल आणि अक्षर पटेल यांची कामगिरी महत्वाची ठरली. कर्णधार रोहित शर्माला सामनावीर घोषित करण्यात आलं आणि न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रला मालिकावीर किताब मिळाला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडनं निर्धारित ५० षटकांत ७ बाद २५१ धावा केल्या. डॅरिल मिशेलनं ६३धावांची

महत्त्वपूर्ण खेळी केली.  राष्ट्रपती दौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या विजयाबद्दल भारतीय संघाचं अभिनंदन केलं आहे.

**<u>अर्थसंकल्प</u>**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प असेल. अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत हा अर्थसंकल्प सादर करतील. अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे. या आधी शेषराव वानखेडे यांनी तेरा वेळा अर्थसंकल्प मांडला होता. त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अजित पवार हे दुसरे अर्थमंत्री ठरतील.

**<u>अधिवेशन</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आजपासून सुरू होत आहे. ४ एप्रिलपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात २० बैठका होणार आहेत.  अधिवेशनादरम्यान, २०२५-२६ वर्षाच्या अनुदान मागण्या आणि संबंधित विनियोग विधेयकावर चर्चा आणि त्यावर मतदान केलं जाणार आहे. त्याचबरोबर बँकिंग कायदे (सुधारणा) विधेयक, रेल्वे (सुधारणा) विधेयक यासह अनेक कायदे चर्चा आणि मंजूरीसाठी घेतले जाणार आहे.

**<u>पतंजलि</u>**

नागपूरच्या मिहान परिसरातल्या पतंजली फुड आणि हर्बल पार्कचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. संत्र्याची प्रतवारी तसच साठवण इथं होणार असून हा प्रकल्प संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं. या प्रकल्पास राज्यशासन सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले. या प्रकल्पासाठी दिवसाला ८०० टन संत्र्यांची आवश्यकता असल्यानं संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला आपोआपच  बाजारपेठ उपलब्ध होण्याबरोबरच स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले.

**ईऑफिस**

शासनाच्या 'ई-आफिस प्रणाली वापराच्या उपक्रमात ७ मार्चपर्यंत गेल्या सात महिन्यांच्या कालावधीत ५१ हजार २३१ 'ई-ऑफिस फाइल्स' तयार करून अकोला जिल्हा परिषद राज्यात अव्वल ठरली आहे. जिल्हा परिषद मुख्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ई-ऑफिस' प्रणालीत नोंदणी करून कामकाज करीत असून, जिल्ह्यातील सात पंचायत समित्यांमधील १४८ कर्मचाऱ्यांनीही 'ई-ऑफिस' प्रणालीत कामकाज सुरू केले आहे.

**वेव्ज**

मुंबईत येत्या मे महिन्यात होणाऱ्या वेव्हज् अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ॲनिमेशन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. भारतातील ॲनिमेशन क्षेत्राला चालना देण्यासह मांगा, वेबटून आणि ॲनिमेशन या शैलींमधल्या भारतीय प्रतिभेला जगासमोर आणणं हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या क्षेत्रातले विद्यार्थी, तसंच नवे आणि अनुभवी व्यावसायिक तज्ञ, वैय्यक्तिक आणि संघिक स्वरुपात या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. वेव्हज् इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळावर या स्पर्धेसाठी नोंदणी करता येणार आहे.

**वेव्ज प्रोमो**

**शासनस्पष्टीकरण**

माध्यम निरीक्षणविषयी केलेल्या शासन निर्णयाचा उद्देश टीकेला आळा घालणं किंवा माध्यमांवर देखरेख करणं हा नसून चुकीच्या माहितीचं विश्लेषण करून त्यावर कार्यवाही करणं असा असल्याचं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे. नागरिकांना अचूक माहिती पुरवणं हे शासनाचं कर्तव्य आहे, चुकीच्या माहितीचं निराकरण

करण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येत असून घटनात्मक मर्यादांचं पालन करणारी कार्यपद्धती विकसित केली जात असल्याचं सरकारने सांगितलं. शासन विविध माध्यम संस्थांशी संवाद साधून या उपक्रमात आवश्यक त्या सुधारणा करत आहे, असंही सरकारने स्पष्ट केलं.

**मुख्यतीर्थ**

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत अहिल्यानगर येथून ७५० यात्रेकरूंचा समावेश असलेली जिल्ह्यातील पहिली रेल्वे काल अयोध्येकडे रवाना झाली. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी हिरवा झेंडा दाखवून रेल्वेला मार्गस्थ केले. यावेळी प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांचे प्रशासनाच्या वतीने स्वागत करून प्रत्येक यात्रेकरूला उपरणे, माळ घालून यात्रेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या यात्रेकरूंबरोबर २० स्वयंसेवक आणि १३ जणांचे वैद्यकीय पथक देण्यात आलं आहे.

**पुरस्कार**

पुण्यातील रामकृष्ण हरि कृषी प्रतिष्ठानच्या वतीनं देण्यात येणारा प्राध्यापक रामकृष्ण मोरे जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक आणि 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांना काल सांगलीमध्ये प्रदान करण्यात आला. तुकोबांची पगडी, शाल, श्रीफळ, मानपत्र आणि 25 हजार रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. कृतज्ञता पुरस्कार बुधाजीराव मुळीक यांना देण्यात आला असून तुकोबांची पगडी, शाल, श्रीफळ आणि मानपत्र असं या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ कवी, वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आलं.

**दिंडीसोहळा**

जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराजांचं चिंतनस्थळ अशी ओळख असलेल्या भंडारा डोंगराच्या पायथ्याजवळ येत्या 17 मार्चपर्यंत गाथा पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. याचा प्रारंभ श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र भंडारा डोंगर अशा भव्य दिंडी सोहळ्याने काल झाला. टाळ-मृदुंगाचा गजर, आणि ज्ञानोबा तुकोबांचा नामघोष करीत हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा दिंडी सोहळा पार पडला.

**संविधानसंमेलन**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था म्हणजेच  बार्टी आणि प्रबुद्ध भारत यांच्या वतीनं देशातील पहिलं संविधान सन्मान संमेलन या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पुण्यात होणार आहे. या संमेलनाचं उद्घाटन समाज प्रबोधनकार, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक, माजी सनदी अधिकारी विकास दिव्यकिर्ती यांच्या हस्ते होणार आहे. तर संमेलनाच्या अध्यक्षस्थानी वंचित बहुजन आघाडीचे  ॲडवोकेट प्रकाश आंबेडकर असतील. संविधानाशी संबंधित विविध विषयांवर तज्ज्ञांची व्याख्यानं, चर्चासत्र आणि संवाद यात होणार असल्याचं प्रबुद्ध भारत मंडळानं कळवलं आहे.

**<u>मृत्यू</u>**

मुंबईत नागपाडा मिंट रोड इथं काल निर्माणाधीन इमारतीच्या पाण्याची टाकी स्वच्छ करत असताना ४ कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी जाऊन पाचही कामगारांना बाहेर काढलं आणि जे जे रुग्णालयात दाखल केलं. यातल्या चार कामगारांचा मृत्यू झाल्याचं डॉक्टरांनी घोषित केलं. एकावर उपचार सुरू आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यातील ५ जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. ११ मार्चपर्यंत कोकणपट्ट्यासह मुंबई, ठाणे, पालघर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येईल असं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे. १९०१ पासूनच्या नोंदीनुसार यंदा फेब्रुवारी दुस-या क्रमांकाचा उष्ण महिना ठरला असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं आपल्या बातमीत म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**